Government of Maharashtra

# माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे 411 001

## अल्पसंख्याकांसाठी प्री मॅट्रीक शिष्यवृत्ती

अल्पसंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या 10 कलमी कार्यक्रमानुसार राज्य शासनामार्फत शासन निर्णय क्र पपंका 2007 / (277/07) / असंक, दिनांक 23 जुलै, 2008 नुसार राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शिख, व पारसी या अल्पसंख्याक समाजातील गुणवत्ताधारक इ 1 ली ते 10 वीच्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष 2008–09 पासून लागु करण्यात येत आहे.

### शिष्यवृत्ती पात्रतेच्या अटी

1. सदर योजना राज्यातील इ 1 ली ते 10 वीच्या सर्व शासकीय / निम शासकीय / मान्यताप्राप्त खाजगी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.
2. अर्जदार विद्यार्थी मागील वर्षी 50% पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेला असावा.
3. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रुपये 1.00 लाखापेक्षा कमी आहे असे विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करु शकतात.
4. आलेल्या अर्जामध्ये ज्याचे वार्षिक उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.
5. इयत्ता 1 लीच्या विद्यार्थ्यांसाठी केवळ वार्षिक उत्पन्नाची अट लागू राहील.
6. उत्पन्नाचा दाखला व धर्माचा दाखला याबाबतचे घोषणापत्र / प्रतिज्ञापत्र साध्या कागदावर अर्जासोबत देण्यात यावे व शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर रु. 10/– च्या नॉन ज्युडिशियल स्टँप पेपरवर देण्यात यावे.
7. शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतरच संबंधित विद्यार्थ्यांनी बँकेमध्ये खाते उघडावे.
8. एका कुटुंबातील 2 दोन पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही.
9. सदर शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही तत्सम योजनेचा लाभ घेता येणार नाही.
10. या शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापकांकडे दिनांक 31.8.2008 पर्यंत अर्ज दाखल करावेत.

यासाठीचा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद याचेकडे उपलब्ध आहेत. संबधित शाळेने विद्यार्थ्यांसाठीचे अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अधिक माहितीसाठी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी www.minorityaffairs.gov.in ही वेबसाईट पहावी.

सही/–
(एम आर कदम)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे 1

DGIPR/2008-2009/1338